# नि. फौ. प्र. क्र. २१/२०२३ मधील नि.क्र. ५ खालील आदेश

अर्जदार जकाण्णा उर्फ जेकाण्णा तिपान्ना गौडगांवी, रा. भिवर्गी, ता. जत. जि. सांगली यांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे भारतीय चलनाच्या रोख रक्कम रु.५०,०००/– रूपये (ज्यास संक्षिप्ततेकरीता येथून पुढे 'जप्त मुद्देमाल' असे संबोधले आहे) परत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२) अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार हा वर नमूद पत्त्यावर राहण्यास आहे. त्याची द्राक्षबागाची शेत असून त्यासाठी औषध फवारणीसाठी रक्कम रू. ५०,०००/– आवश्यकता होती. सदर पैसे आणण्यासाठी मादन्ना तोदलबगी यांचेकडून रक्कम रू. ५०,०००/– घेण्यासाठी दि. २९/१०/२०२१ रोजी त्यांचे घरी गेले. त्यांचेकडून सदर रक्कम रू. ५०,०००/– घेऊन परत येताना शामराव महादेव कोरे याने अर्जदाराच्या गाडीला हात करून थांबवून त्याला सोडण्यास सांगितले. तो अर्जदाराच्या गाडीवर बसवून भिवर्गी हायस्कूल जवळ उतरला. त्यानंतर अर्धाकिलोमिटर अंतरावर गेल्यावर शिवानंद जगदेव बिराजदार, मलकारी मल्लेश बिराजदार व सागर आनंदाराव बिराजदार हे अर्जदाराजवळ येऊन त्याला मारहाण करून त्याच्या खिशातील रक्कम रू. ५०,०००/– काढून घेऊन पळून गेले. अर्जदाराला मारहाण केल्यामुळे तो ग्रामीण रूग्णालय येथे उपचार घेऊन दि. २९/१०/२०२१ रोजी उमदी पोलीस ठाणे येथे भा.द.वि.कलम ३२७, ३२४, ३२३ व ३४ प्रमाणे फिर्याद दाखल केली. त्या अनुषंगाने दि. ०६/०१/२०२३ रोजी मे. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. फिर्याद दाखल केल्यानंतर उमदी पोलिसांनी आरोपींचा शोध घेऊन अटक केली व त्यांचेजवळील रोख रक्कम रू. ५०,०००/– जप्त केले. उमदी पोलीस ठाण्याकडून दि. १८/०३/२०२३ रोजी अर्जदारास आरोपींकडून रोख रक्कम रू. ५०,०००/– जप्त करण्यात आल्याचे सांगितले. सदर रक्कम परत मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केले आहे.

३) अर्जदार हा शेती व्यवसाय करत असून त्याला दैनंदिन व्यवहारासाठी रोख रकमेची अत्यंत गरज असल्याने ती परत मिळणे आवश्यक आहे. सदर रक्कम अर्जदारास परत मिळाल्यास सदर केसचा निकाल होईपावेतो सदर रकमेचा हमीपोटी अर्जदार बॉण्ड देण्यास तयार आहे. तसेच मे. न्यायालयाने घातलेल्या अटी व शर्ती अर्जदार पाळण्यास तयार आहे. सबब, सदरचे जप्त मुद्देमालाचा ताबा अर्जदारास मिळावा अशी अर्जदारातर्फे विनंती करण्यात आली आहे.

४) त्यानंतर प्रस्तुत अर्जावर सरकारी वकिलांचे व आरोपी सागर बिराजदार यांचे म्हणणे मागविण्यात आले. सरकारी वकिलांचे म्हणणे असे की, प्रस्तुत कामी जप्त मुद्देमाल हा गुन्ह्यातील महत्त्वाचा पुरावा आहे. मुद्देमाल अर्जदारास परत दिल्यास अर्जदार दैनंदिन व्यवहारात वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५) आरोपीचे म्हणणे असे की, प्रस्तुत अर्जातील मजकूर खोटा व चुकीचा असून तो त्याला मान्य व कबूल नाही. अर्जदाराने मूळ अर्जातील कथनांत विधिसंघर्षीत बालक शिवानंद जगदेवाप्पा उर्फ जगदेव बिराजदार याचा उल्लेख केला आहे. सदर प्रकरण सांगली येथील ज्युवेनाईल कोर्टात सध्या न्यायप्रविष्ट आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज या मे. न्यायालयात दाखल करून घेऊन चालविण्याचा अधिकार नाही. आरोपी क्र. २ व ३ यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे २० एबीए २८३९/२०२१ ने अटकपूर्व जामीनाकरिता अर्ज दाखल केला होता. नामदार उच्च न्यायालय यांनी अर्जदारांचा अर्ज मंजूर केला आहे. सदर आदेशात मा. न्यायालयाने आरोपींना रक्कम रू. ५०,०००/- तपासी अंमलदार यांचेकडे आदेश झाल्यापासून दोन आठवड्याचे आत जमा करण्याबाबत आदेश केला होता. सदर आदेशानुसार सदर रक्कम मे. न्यायालयात केवळ डिपॉझीट करण्याकरिता दिली

आहे. म्हणून सदर रक्कम काढून घेण्याचा फिर्यादीला अधिकार नव्हता व नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदर रक्कम काढून घेण्याची आहे असा आदेश केलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्जाचे अनुषंगाने वादविषय रक्कम रू. ५०,०००/– अर्जदारास दिल्यास मा. उच्च न्यायालयाचे हुकुमाचा अवमान होणार आहे. तसेच वादविषय गुंतागुंतीचे होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६) अर्ज, आरोपीचे म्हणणे तसेच सरकारी वकिलांचे म्हणणे वाचले. अर्जदार/ फिर्यादीचे कथन असे आहे की, त्यांनी मागणी केलेली रक्कम रू. ५०,०००/– गुन्ह्यात आरोपीकडून जप्त करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणातील प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता आरोपींविरुद्ध भा.दं.सं. चे कलम ३२७, ३२४, ३२३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचा आरोपींविरुद्ध आरोप आहे. सदर प्रकरणात आरोपींनी जबरी चोरी केल्याचे आरोपींवर आरोप नाही. फिर्यादी/अर्जदार याने दिलेल्या वर्दीजबाबात घटनेच्या वेळी आरोपींनी त्याच्या खिशातील रक्कम रू. ५०,०००/– काढून नेल्याचा आरोपींवर आरोप आहे. आरोपींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे २० एबीए २८३९/२०२१ ने अटकपूर्व जामिनाकरिता अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये आरोपींतर्फे स्वतःहून रक्कम रू. ५०,०००/– तपासी अधिकाऱ्याकडे दोन आठवड्यात जमा करण्याची विनंती आरोपींनी केल्यावर ते मा. उच्च न्यायालयाने मंजूर करून आरोपींचे अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. त्याअनुषंगाने सदरची रक्कम आरोपींनी तपासी अधिकाऱ्याकडे जमा केली होती. सदरची रक्कम आरोपींनी त्यांचा जामीन मंजूर व्हावा म्हणून जमा केलेली आहे. त्यामुळे सदरची रक्कम फिर्यादी/अर्जदाराने केलेल्या आरोपानुसार आरोपींनी फिर्यादीची घटनेच्या वेळी काढलेली रक्कम रू. ५०,०००/– आरोपींनी तपासी अधिकाऱ्याकडे जमा केले असे ग्राह्य धरता येत नाही.

७) आरोपींनी जमा केलेली रक्कम हे गुन्ह्यात जप्त केलेली रक्कम नाही. त्यामुळे खटल्याचे संपरिक्षा संपल्यानंतर आरोपींनी अर्जदार/फिर्यादीची रक्कम घटनेच्या वेळी खिशातून काढली होती ही वस्तुस्थिती सिद्ध झाल्यावरच सदर रकमेच्या संबंधाने अर्जदार/फिर्यादी आपली मागणी करू शकते. सदरचा खटला सध्या पुराव्याच्या टप्प्यावर आहे. अशा परिस्थितीत अर्जदार/फिर्यादीला सदरची रक्कम परत करता येणार नाही. म्हणून अर्जदाराची मागणी या टप्प्याला न्यायसंगत नसल्याने मंजूर करता येणार नाही. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे,

## <u>आ दे श</u>

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2024.09.06 16:46:22 +0530

दिनांकः– ०६/०९/२०२४ **(प्रकाश सी. बछले)**

स्थळ :– जत न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग, जत